# यावल महाविद्यालयात हृदयरोग या विषयावर व्याख्यान संपन्न

यावल (प्रतिनिधी) येथील जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सह.समाजाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील यावल, विद्यार्थी विकास विभाग व आय. क्यू. ए. सी. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हृदयरोग विषयावर ऑनलाइन व्याख्यान आयोजित करण्यात आले. सदर कार्यक्रम प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. व्ही. व्ही. पाटील सर यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी सांगितले की, 'जागतिक हृदय दिन' ही एक जागतिक मोहिम आहे, ज्यामुळे हृदयरोग व हृदयविकारा संदर्भात जाणीव करून दिली जाते. ज्यामुळे प्रत्येकाने आपल्या हृदयाची काळजी कशी घ्यावी याची जाणीव होते.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉं.देवेंद्र पाटील
( एम.डी.डी.एम, ऑंर्किड मल्टी स्पेशालीटी हॉंस्पिटल.जळगांव ) यांनी हृदय रोग व हृदयविकारावर सखोल मार्गदर्शन केले. हृदय रोगांमध्ये कोरोनरी आर्टेरी डिसीज यात अॅन्जीओग्राफी, अॅन्जीओप्लास्टी व बायपास कसे केले जाते हे त्यांनी स्लाईड शोच्या माध्यमातून समजावून दिले. हृदय रोग वय, लिंग, खानपान व डायट हे फॅक्टर परिणाम करतात असेही त्यांनी सांगितले. व्यसन (धूम्रपान व मद्यपान) पासून दूर राहून हृदयरोग टाळता येते. हृदय स्वस्थ ठेवण्यासाठी योगा व प्राणायाम परिणामकारक ठरत आहे असेही त्यांनी सांगितले. अध्यक्ष प्रा. एस. आर. गायकवाड यांनी हृदय रोगामध्ये हृदय ट्रान्सप्लांट कसे व केव्हा करावे याबद्दल माहिती दिली. हृदय दान करणाऱ्या व्यक्तीचे वय किती असावे याबद्दल मार्गदर्शन केले. ऑनलाईन कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी हजर होते.

कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन श्री. व्ही. व्ही. पाटील सर यांनी केले. तसेच आभार उपप्राचार्य श्री. संजय पाटील सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न होण्यासाठी उपप्राचार्य प्रा. एम डी. खैरनार, प्रा. ए. पी. पाटील, प्रा. डॉ. एस. पी. कापडे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.



# यावल महाविद्यालयात हृदयरोग या विषयावर व्याख्यान संपन्न

यावल । प्रतिनिधी –

येथील जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सह. समाजाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील यावल, विद्यार्थी विकास विभाग व आय. क्यू. ए. सी. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हृदयरोग विषयावर ऑनलाइन व्याख्यान आयोजित करण्यात आले. सदर कार्यक्रम प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. व्ही. व्ही. पाटील सर यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी सांगितले की, मजागतिक हृदय दिनफ ही एक जागतिक मोहिम आहे, ज्यामुळे हृदयरोग व हृदयविकारा संदर्भात जाणीव करून दिली जाते. ज्यामुळे प्रत्येकाने आपल्या हृदयाची काळजी कशी घ्यावी याची जाणीव होते.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ.देवेंद्र पाटील (एम.डी.डी. एम, ऑर्किड मल्टी स्पेशालीटी हॉस्पिटल.जळगांव) यांनी हृदय रोग व हृदयविकारावर सखोल मार्गदर्शन केले. हृदय रोगांमध्ये कोरोनरी आर्टेरी डिसीज यात अॅन्जीओग्राफी, अॅन्जीओप्लास्टी व बायपास कसे केले जाते हे त्यांनी स्लाईड शोच्या माध्यमातून समजावून दिले. हृदय रोग वय, लिंग, खानपान व डायट हे फॅक्टर परिणाम करतात असेही त्यांनी सांगितले.

व्यसन (धूम्रपान व मद्यपान) पासून दूर राहून हृदयरोग टाळता येते. हृदय स्वस्थ ठेवण्यासाठी योगा व प्राणायाम परिणामकारक ठरत आहे असेही त्यांनी सांगितले. अध्यक्ष प्रा. एस. आर. गायकवाड यांनी हृदय रोगामध्ये हृदय ट्रान्सप्लांट कसे व केव्हा करावे याबद्दल माहिती दिली. हृदय दान करणार्या व्यक्तीचे वय किती असावे याबद्दल मार्गदर्शन केले. ऑनलाईन कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी हजर होते. कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन श्री. व्ही. व्ही. पाटील सर यांनी केले. तसेच आभार उपप्राचार्य संजय पाटील सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न होण्यासाठी उपप्राचार्य प्रा.एम डी. खैरनार, प्रा. ए.पी. पाटील, प्रा. डॉ. एस. पी. कापडे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.